# नागपूर महानगरपालिका

***e-newsletter***

**Volume 1, Issue 1** **Month :- June-2015**

कर भरा

जप्ती टाळा

आतील पानावर

"ऑरेंज सिटी मेयर मॅराथॉन स्पर्धेचे" आयोजन करणार...मा. महापौर प्रवीण दटके 2

## उर्जा बचत अभियान महापौर प्रविण दटके यांचे उपस्थितीत संपन्न

**दैनंदिन व्यवहारात सर्व नागरिकांनी अनावष्यक विजेचा वापर टाळावा : महापौर दटके पोर्णिमेच्या रात्री सावरकर चौक खामला चौकात म.न.पा . व्दारे उर्जा बचत अभियान महापौर प्रविण दटके यांचे उपस्थितीत संपन्न**

दैनंदिन व्यवहारात सर्व नागरिक व प्रतिश्ठानांनी अनावष्यक वीजेचा वापर टाळून उर्जा बचत केल्यास पाण्याची व कोळषाची बचत होईल. तसेच त्यासोबत अर्थकारण व पर्यावरण हे आयाम जोडलेले असल्यामुळे उर्जा बचत ही संकल्पना चांगल्याप्रकारे पूर्ण होईल असा विष्वास मा.महापौर श्री. प्रवीण दटके यांनी व्यक्त केला.

मा.महापौर श्री.प्रवीण दटके पुढे म्हणाले की हा उपक्रम या पुढेही दर पोर्णिमेला सुरू ठेवा शहरातील व वेगवेगळया भागात मोठ–मोठया चौकांत उर्जा बचत कार्यक्रम राबवुन जनजागृती करा . तरी लोकांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून दर पोर्णिमेला रात्री उर्जा बचत अभियानाला स्वयं स्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आव्हाहण केले.

दर पोर्णिमेला चंद्राच्या प्रकाशात रात्री 8 ते 9 दरम्यान वीजेचे दिवे व उपकरणे बंद ठेवून उर्जा बचत करण्याचे म.न.पा.ने राबविलेल्या उपक्रमा अंतर्गत मंगळवार दिनांक 02/06/2015 रोजी पोर्णीमेच्या दिवशी रात्री सावरकर चौक, खामला चौकाकडून छत्रपती चौक, प्रतापनगर रोड, पांडे ले–आऊट खामलाकडे जाणारा मार्ग, वर्धारोड, लक्ष्मीनगर चौकाकडे जाणारामार्ग, अजनी चौकाकडे जाणारामार्ग त्रीमुर्तीनगरकडे जाणारा मार्ग, ऑरेंजसिटी हॉस्पीटलकडे जाणारा मार्ग, सावरकर चौकातून वर्धा रोड व चहूकडे जाणारा मार्ग आदि भागातील रस्त्यावरील पथदिवे व होर्डिंगवरील दिवे बंद ठेवून उर्जा बचत दिन राबविला.

यावेळी लक्ष्मीनगर झोन सभापती श्रीमती जयश्री वाढीभस्मे, कर आकारणी समितीचे सभापती श्री.गिरीश देशमुख, उपसत्ता पक्ष नेते श्री. मुन्ना यादव, ज्येष्ठ नगरसेवक श्री.गोपाल बोहरे, नगरसेवक श्री. प्रकाश तोतवाणी, नगरसेविका श्रीमती पल्लवी शामकुळे, उषा निशीतकर, निलीमा बावणे, अति. उपायुक्त श्री.जयंत दांडेगांवकर, सहा. आयुक्त श्री.गणेश राठोड, विद्युत उपअभियंता श्री.बुजाडे, श्री.दत्तात्रय माटे, ग्रीन व्हीजल फाऊंडेशनचे संचालक कौस्तुभ चटर्जी, दक्षा बोरकर, विष्णदेव यादव, शितल चौधरी, आदि यावेळी स्वतःहा या अभियानात सहभागी होऊन म.न.पा.अधिकारी कर्मचारी व ग्रीन व्हीजील फाउंडेशनच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत थांबून नागरिकांशी व विविध प्रतिष्ठानांशी संवाद साधून त्यांना उर्जा बचतीचे महत्व विशद केले . केवळ दर पोर्णिमेला रात्री उर्जा बचत करण्यासोबतच दैनंदिन व्यवहारात देखील आपले घरी, प्रतिष्ठान, कार्यालयात अनावश्यक वीजेचे दिवे व वीजेची उपकरणे बंद ठेवून उर्जाबचतीस सहकार्य करावे असे आवाहन महापौर श्री.प्रवीण दटके यांनी शहरातील जनतेला केले.

एक युनिट वीजेच्या निर्मितीसाठी 500 ग्रॅम कोळसा, 7.5 लिटर पाणी खर्च होतो व 1000 ग्रॅम कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन होते. त्यामुळे वीज वाचवा, पृथ्वी वाचवा व पोर्णिमा दिवस साजरा करा, असेही आवाहन मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी यावेळी केले.

मा.महापौर श्री.प्रवीण दटके, उपसत्ता पक्षनेते श्री.मुन्ना यादव, सभापती श्रीमती जयश्री वाढीभस्मे, गिरीश देशमुख, गोपाल बोहरे व प्रकाश तोतवाणी, पल्लवी शामकुळे व उषा निशितकर यांनी यावेळी ग्रीन व्हीजलचे श्री.कौस्तुभ चटर्जी व कार्यकर्त्यासमवेत विद्युत दिवे व उपकरणे बंद करण्यासाठी फिरले. सावरकर चौक खामला चौकातील चारही बाजुला जाणाऱ्या सर्व प्रमुख मार्गवरील दुकानदारांनी, हॉटेल व प्रतिष्ठांनी रस्त्यावरिल दुकानदारांनी आपल्या दुकानातील अनावश्यक दिवे व अन्य उपकरणे बंद ठेवून उर्जा बचत अभियानाला मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला. तसेच चौकातील मोठमोठया होर्डींगवरील दिवे मालवून टाकण्यात आले होते. त्याचप्रमाणे शहरातील म.न.पा.च्या 10 ही झोन अंतर्गत विज बचत अभियान राबविण्यात आले. जनतेनी प्रतिसाद देवून सुमारे 2749.00 KW युनिटची विज बचत केली. यावेळी मा.महापौर श्री.प्रवीण दटके विज बचत अभियानाला शहरातील जनतेनी मोठया प्रमाणात प्रतिसाद दिल्याबद्दल जनतेचे आभार मानले.

यावेळी सहा. अभियंता मा. सलीम ईकबाल, म.न.पा.चे अभियोक्ता ॲड.व्ही.डी.कपले, विद्युत अभियंता श्री. गजेन्द्र तारापूरे, ग्रीन व्हीजलचे कार्यकर्ते दक्षा बोरकर, कु.सुरभी जैस्वाल, राजन गंगवाणी, लाला रखनानी, शितल चौधरी, बी.डी. यादव, विश्वजीत पाईकराव, ईश्वर भोसकर, कल्याणी वैद्य, निलेश मुघाटे, आकाश शेंडे, राजन रामचंदानी, नारायन भोजवाणी, सूनिल नवघरे, मोहन वाडीभस्मे, गजानन निशीतकर यांचेसह ग्रीन व्हीजन फाउंडेशनचे अनेक कार्यकर्ते, गणमान्य नागरिक अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

## “ऑरेंज सिटी मेयर मॅराथॉन स्पर्धेचे” आयोजन करणार...मा.महापौर प्रवीण दटके

**शहरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्याच्या दृष्टीने “ऑरेंज सिटी मेयर मॅराथॉन स्पर्धेचे” आयोजन करणार...मा.महापौर प्रवीण दटके**
**ऑरेंज सिटी मेयर मॅराथॉनचे आयोजन संदर्भात मा.महापौर व्दारा आढावा**

नागपूर शहरातील क्रीडाप्रेमी, नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्थाचे कर्मचारी यांच्या सहभागाने नागपूर शहराला भूषणास्पद अशी “ऑरेंज सिटी मेयर मॅराथॉन”चे आयोजन संदर्भात विचारविनिमय करण्याकरिता आढावा बैठकीचे आयोजन मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांच्या अध्यक्षतेखाली आज दिनांक 15.06.2015 रोजी सकाळी 11.00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील कार्यालयातील स्व.डॉ.पंजाबराव देषमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात करण्यात आले होते.

या बैठकीला सभापती, स्थायी समिती श्री.रमेश सिंगारे, सत्तापक्ष नेता श्री.दयाशंकर तिवारी, आयुक्त श्री.श्रावण हार्डीकर, षिक्षण समिती सभापती श्रीमती चेतना टांक, क्रीडा समितीचे सभापती श्री.हरिश दिकोंडवार, ज्येश्ठ सदस्य श्री.सुनिल अग्रवाल, उपायुक्त श्री.आर.झेड. सिद्दीकी, शिक्षणाधिकारी श्री.अषोक टालाटूले, सेवानिवृत्त क्रीडा अधिकारी डॉ.हंबीरराव मोहिते, क्रीडा निरिक्षक श्री.इमाने, नागपूर जिल्हा ॲथलॅटिक असो.चे श्री.शरद सुर्यवंषी आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

नागपूर शहरात मॅराथॉन होणे ही प्रतिष्टेची बाब असून राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरची मॅराथॉन शहरात व्हावी असा प्रस्ताव क्रीडा संस्थाच्या माध्यमातुन आलेला होता. त्या अनुशंगाने शहरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्याच्या दृष्टीने युवा दिनानिमित्त ऑरेंज सिटी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन जानेवारी 2016 पासुन सुरू करण्याच्या दृष्टीकोनातून आज बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे मा.महापौरांनी यावेळी भूमीका स्पष्ट करतांना सांगितले. याकरिता वेळो–वेळी बैठक घेवून योग्य आयोजनाचे दृष्टीने पुढील दिशा निश्चीत करण्यात येईल.

नागपूरातील सर्व नागरिक खेळाडू, धावक व स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग घेवून ऑरेंज सिटी मेयर मॅराथॉन स्पर्धा ही प्रत्येक वर्षी करण्याचे बैठकीत निश्चीत करण्यात आले. याकरिता सर्व संबंधित संस्थांनी ही स्पर्धा आयोजित करण्यास सहकार्य करावे असे आवाहन मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी केले.

## महानगरपालिकेचे उपक्रम

### उर्जा बचत अभियान




### स्वच्छता अभियान

